


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# जागतिकीकरण आणि आदिवासी कविता

**डॉ. विजयेंद्र विश्वनाथ पाटील**
सहाय्यक प्राध्यापक,
मराठी विभाग,
गि. द. म. कला, के. रा. न. वाणिज्य व म. धा. विज्ञान,
महाविद्यालय, जामनेर तालुका, जामनेर, जिल्हा जळगाव.

- **गोषवारा (**Abstract):-

अव्वल इंग्रजी कालखंडात मराठी साहित्यात अनेक नवसाहित्य प्रवाहांचा परिचय मराठी साहित्याला झाला सुरुवातीच्या काळात अनेक साहित्यिकांनी आपल्या साहित्यात कष्टकरी शेतकरी मजूर आदिवासी माणसांचे चित्रण प्रतिकात्मक पद्धतीने केले परंतु हे साहित्य फारसे प्रभावी ठरले नाही प्रत्यक्ष जीवनानुभावाचा स्पर्श त्याला न होता हे निर्माण झालेले साहित्य नागर संस्कृतीच्या दृष्टीतून केलेले होते त्यामुळे त्यात वास्तवता संवेदनशीलता प्रत्यक्ष जाणीव वेदना कुठेच दिसत नव्हत्या साधारणता १९६० नंतर मराठी साहित्यात दलित ग्रामीण श्री वादी जनवादी मार्क्सवादी व आदिवासी हे साहित्य प्रवाह निर्माण झाले यापैकी दलित व ग्रामीण साहित्याने अर्वाचीन कालखंडात सुरुवातीच्या काळात निर्माण झालेल्या साहित्याची चौकट मोडून काढले प्रस्थापित नागर संस्कृतीतील लेखकांना जुगारून स्व अनुभव व स्व जाणिवा आपल्या स्वतःच्या साहित्यात मांडून साहित्याच्या प्रवाहात नवीन साहित्य प्रवाह निर्माण केला त्यालाच आपण साठोत्री साहित्य असे म्हणतो १९६० नंतर निर्माण झालेल्या याच प्रवाहंपैकी १९७५ ला आदिवासी साहित्य हा साहित्य प्रवाह निर्माण झाला आदिवासी साहित्यातही अनेक साहित्यिकांनी आदिवासींच्या दुःखाला वेदनांना वाचा फोडण्याचे काम केले जसजसा काळ बदलत गेला बदलत्या काळाचा परिणाम आदिवासी साहित्यावरही झाला औद्योगिकीकरण शहरीकरण उदातीकरण व जागतिकीकरण यांचा परिणाम सुद्धा आदिवासी साहित्यावर झाला आदिवासी साहित्यिकांनी आपल्या व्यथा वेदनांना वाट मोकळी करून देण्यासाठी कथा व कविता हे प्रमुख प्रकार हाताळले बदलत्या काळाचा व जागतिकीकरणाचा परिणाम आदिवासी लोकांच्या जीवनावर कसा होत आहे डोंगरदऱ्यात राहणारी आदिवासी जमात जागतिकीकरणाच्या मायाजालात कशी नेस्तनाबूत होत आहे या सर्वांना टाहो बोलण्याचे काम अत्यंत तीव्र शब्दात आदिवासी कवितेतून प्रकट होताना दिसते. प्रारंभीच्या मराठी

साहित्यात कुठेही आदिवासी समाज व्यवस्थेचे चित्रण आढळत नाही . वर्षानुवर्षे प्रस्थापितांचा अन्याय ,अत्याचार, शोषण मूकपणे सहन करून आपल्या वाड्या ,वस्तीवर ,पाड्यावर निसर्गाच्या सानिध्यात जीवन जगणारा आदिवासी आपल्या न्यायासाठी, हक्कासाठी वणवण भटकंती करणारा आदिवासी खऱ्या अर्थाने प्रकट होतो तो कवितेतून जीवनाच्या व्यथा वेदना दाहकतेने तीव्र शब्दात मांडण्याचे काम आदिवासी कवींनी केले आहे . जागतिकीकरणाच्या या प्रवाहात देश महासत्ता बनेल, आर्थिक दृष्ट्या सक्षम होईल पण आदिवासी हा दुर्लक्षितच राहील. जो निसर्ग आदिवासी जमातींसाठी त्यांचा पालक आहे, तोच शिल्लक राहणार नाही मग आमच्या जमातींचे काय ?असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला जागतिकीकरणाच्या नावाखाली औद्योगिकीकरणाच्या नावाखाली आदिवासी जमाती नामशेष होण्याची वेळ आली आहे . हिरवी जंगले नष्ट होत आहे तर सिमेंटची जंगले दिवसेंदिवस वाढत आहे. आदिवासी वाड्या ,वस्ती ,पाडे ओस पडत आहेत. जागतिकीकरणाच्या या प्रवाहात आदिवासी जमाती हरपत चालले आहेत. हेच आदिवासी जमातींपुढील प्रश्न, समस्या आज आदिवासी कवितेचा आशय ठरत आहे .जागतिकीकरणाचा परिणाम फक्त आदिवासी जमातींवरच झाला असे नाही, तर तो सबंध मानवी समूहावर होणार आहे .त्यामुळे आदिवासी कविता हे फक्त आदिवासी जमाती पुरतीच मर्यादित न राहता त्यात संपूर्ण मानव जातींच्या कल्याणाची भूमिका मांडली आहे . निसर्ग आणि मानव यांचे नाते किती अतूट आहे निसर्गाच्या अस्तित्वावरच मानवाचे अस्तित्व अवलंबून आहे. म्हणून ते टिकवणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. असे निसर्गाचे महत्त्व मानवाला पटवून देण्याचे काम आदिवासी कविता करते .आधुनिकीकरण, जागतिकीकरण ,नागरिकरण यामध्ये आदिवासी जमातींचे अस्तित्व टिकवायचे कसे ? यावर आदिवासी कविता भाष्य करते.

- **विषय विवेचन**

शतकानुशतके रानावनात राहिलेल्या नागर समाज व संस्कृतीपासून कोसो लांब राहणाऱ्या तंत्रज्ञानाचा स्पर्श नसणाऱ्या डोंगर दर्या खोऱ्यात पाड्यावर जीवन व्यतीत करणाऱ्या

आदिवासी जमातीत स्वातंत्र्योत्तर काळात फारसा बदल झाला नाही. मानवाच्या आदिम अवस्थेपासून निसर्गाशी असणारे अतूट नाते व निसर्गाची असणारी जवळीक हीच आदिवासी जमातीची असलेली परंपरागत संपत्ती परंतु आदिवासी जमातीत जन्मलेल्या व शिक्षणाची कास धरलेल्या काही नवयुवकांना इतर साहित्य प्रवाहाप्रमाणेच आपल्या जमातीचा इतिहास शोधतांना तो फारसा सापडत नव्हता कारण यापूर्वी आदिवासींचे चित्रण हे काही अपवादानेच प्रतिनिधिक स्वरूपात त्यांना आढळले इतिहासात आदिवासींनी केलेल्या कार्याची किंवा शौर्याची गाथा कुठेही दिसली नाही अगदी अलीकडच्या इंग्रजांशी झालेल्या पहिल्या लढ्याची नोंद ही कुठे दिसली नाही हे सर्व आदिवासी साहित्य निर्मितीसाठी ऊर्जा केंद्र ठरले नागरी संस्कृती आणि वस्ती पासून दूर राहिलेले ते आदिवासी 1991 ला जागतिकीकरणाला सुरुवात झाली या जागतिकीकरणाची व्याप्ती उद्योग व्यापार शिक्षण याचबरोबर साहित्य क्षेत्रातही पसरली जागतिकीकरणाचे आक्रमण आदिवासींच्या जीवनावरही होऊ लागले नद्या नाले डोंगर झाड वृक्ष पशुपक्षी वने जंगले हे म्हणजे आदिवासींचे सगेसोयरे हा निसर्ग म्हणजेच आदिवासींचा पालक आणि याच पालकत्वावर जागतिकीकरणाने अतिक्रमण केले. मूठभर लोकांच्या हितासाठी जागतिकीकरणाच्या नावाखाली आदिवासी लोकांची व नैसर्गिक साधन संपत्तीची लूट मोठ्या प्रमाणात सुरू झाली. वनजमिनी ताब्यात घेणे आदिवासींच्या जमिनीवर उद्योग उभारणे नवीन प्रकल्पांना कवडीमोल भावा जमिनी देणे आदिवासींच्या हिताकडे दुर्लक्ष करणे त्यांच्या मूलभूत गरजा दुर्लक्षित करून प्रसंगी बळाचा वापर करून त्यांना त्यांच्याच घरातून बाहेर काढणे हा असा अन्याय अत्याचार जागतिकीकरणाच्या नावाखाली सुरू झाला आणि याच अन्यायाला वाट मोकळी करून देण्याचे काम आदिवासी कवितेने केले "जागतिकीकरणाच्या परिणामाचा विकास अल्प परंतु विकासापेक्षा त्याचे अनेक प्रश्न समस्याच अधिक निर्माण झालेल्या बघायला मिळतात आदिवासी भटके विमुक्त दलित बालके स्त्रिया व वृद्ध यांच्या बाबतीत जागतिकीकरणाने जगण्याच्या संघर्षासारखे अनेक प्रश्न जन्माला घातले आहेत त्यात बेरोजगारी कुपोषण स्थलांतर या नाना प्रश्नांनी त्यांना ग्रासले आहे".१

आदिवासी लोकांची एक स्वतंत्र व वैशिष्ट्यपूर्ण अशी जीवनशैली आहे निसर्गाच्या सानिध्यात राहून आपली बोली आपले सण उत्सव लोकोत्सव प्रथा परंपरा रितीरिवाज विधी हे सर्व ते निसर्गाच्या सानिध्यात राहूनच शिकले आदिवासींची हीच संस्कृती टिकावी व आदिवासींचे अस्तित्व अबाधित राहावे यातूनच आदिवासी साहित्याची निर्मिती झाली 1979 ला

भद्रावती येते विनायक तुमराम यांनी भारतातील पहिले आदिवासी साहित्य संमेलन घेतले व आदिवासी साहित्य चळवळीचा जन्म झाला मराठी साहित्यात आदिवासी साहित्य प्रवाह एक नव प्रवाह निर्माण झाला "1975 नंतर ग्रामीण साहित्य आणि त्या पाठोपाठ आदिवासी साहित्य चळवळ सुरू झाली विषमतावादी शोषण दृष्टीत समाज व्यवस्थेला नाकारणे त्याविरुद्ध बंड आणि विद्रोह करणे हे या चळवळीचे समान सूत्र बनले" २

आदिवासी साहित्याचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे आदिवासी साहित्यात कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र यासारखे साहित्यप्रकार फारसे हाताळले गेले नाहीत. आपल्या भावभावना स्व जाणिवा व स्व अनुभव व्यक्त करण्यासाठी कविता हा साहित्यप्रकार मोठ्या प्रमाणात हाताळला गेला कवितेकडे सहसा पाहण्याची आपली वृत्ती ही सौंदर्यवादी असते. परंतु साठोत्तरी साहित्य प्रवाह निर्मितीनंतर कवितेचे स्वरूप तिचे तंत्र व कवितेचा अविष्कार पूर्णतः बदललेला दिसतो. आदिवासी साहित्यातही आदिवासी कविता आहे, संपूर्ण आदिवासी जमातींचे प्रतिनिधित्व करताना दिसते. आदिवासी साहित्यात मौखिक वाङ्मयाची समृद्ध परंपरा आहे. वैशिष्ट्यपूर्ण लोकवाङ्मय हे आदिवासी कवितेचे प्रमुख ऊर्जा स्रोत आहे तर निसर्ग हा आदिवासी कवितेचा आत्मा आहे. आदिवासी जमाती ह्या सुद्धा मुख्य प्रवाहापासून दूर होत आहेत प्रस्थापित समाजव्यवस्थेपासून लांब होत आहेत निसर्गाच्या सोबत राहून निसर्गाप्रमाणेच एकदम बदल स्वीकारावा तशी आदिवासी कविता जन्माला आली जागतिकीकरणानंतर आदिवासी समाजावर जे पहिले आक्रमण झाले ते म्हणजे त्यांच्या संस्कृतीवर आणि त्यातूनच आदिवासी कवितेचा जन्म झालाआपले प्राचीन धर्मग्रंथ हे पद्यात्मक स्वरूपाचेच होते. त्यानंतर मराठी साहित्यात मोठ्या प्रमाणात संत साहित्य निर्माण झाले परंतु या कुठल्याही साहित्यात आदिवासी जमातींचे चित्रण किंवा वर्णन आले नाही आदिवासींच्या प्रश्नांची किंवा त्यांच्या जीवनाची दखल घेतली गेली नाही . आर्यांचा उल्लेख साहित्यात आढळतो संस्कृती निर्मितीत आर्यांचे योगदान महत्त्वाचे आहे असेही म्हटले जाते परंतु आर्यांच्या पूर्वीही अनेक आदिवासी जमाती चे अस्तित्व या पृथ्वीतलावर होते त्यांची स्वतंत्र एक संस्कृती होती पण त्याचा साधा उल्लेख या साहित्यात आढळत नाही म्हणून अशा धर्मांध संस्कृतीला नाकारण्याची भाषा आदिवासी कविता करते. आदिवासींची संस्कृती ही श्रेष्ठ आहे आणि ती इतर संस्कृतीची निर्माती आहे. निसर्गाची प्रेरणा घेऊन आदिवासींनी स्वतःचे एक वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती

निर्माण केली. आणि आज त्याच आदिवासींच्या संस्कृतीवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केले जात आहे ते रोखण्याचे काम आदिवासी कविता करताना दिसते. आर्य लोकांनी या देशातील भूमीवर वर्षानुवर्ष राहत असलेल्या म्हणजेच अनार्य असलेल्यांना नागरी वस्तीत राहण्यास मज्जाव केला त्यामुळे अनेक जमाती या रानावनात दऱ्याखोऱ्यात राहू लागल्या आपली उपजीविका करण्यासाठी रानात कंदमुळे शोधणे , शिकार करणे आणि आपले पोट भरणे आदिवासींसाठी ही जंगले आणि तेथील वनसंपदा हेच त्यांच्यासाठी सर्वस्व आहे. ही छळवादाची परंपरा अगदी आर्य पासून तर आजवर थांबलेली नाही.

"इथे प्रतिष्ठा वाढली धर्मांध संस्कृतीची!
आदिवासींना वनवासी बनविणाऱ्या भिजून छळवादाची !
अनार्य मूळ इथले, आर्य मागून आले !
उद्ध्वस्त करण्या आदिवासी वनकल्याण आश्रम नीती !" ३

सुरुवातीच्या काळात आदिवासी साहित्यात उत्तमराव धोंगडे, वाहरु सोनवणे, भुजंग मेश्राम, माधव सरकुंडे, सुनील कुमरे, विनायक तुमराम, सुखदेव उईके, उषाकिरण आत्राम यासारख्या अनेक आदिवासी कवींनी आपल्या जमातीचे दुःख वेदना कवितेच्या माध्यमातून मांडले. आदिवासी कसा जगतो? आदिवासी कसा राहतो? आदिवासी म्हणजे कोण? आदिवासीची निसर्गाचे नाते काय? यासर्व प्रश्नांची उकल आदिवासी कवितेतून आपणास होताना दिसते. आदिवासी कवितेच्या संदर्भात डॉ. मनोहर सुरवाडे म्हणतात,"फुले आंबेडकर विचारांचा वारसा आणि बिरसा मुंडाची क्रांतिकारकता या कवींना उजेड्याचा मार्ग दाखविणे त्यामुळेच त्यांची कविता समग्र परिवर्तनासाठी जुन्या बुरसलेल्या विचारांना तिलांजली देण्याची प्रतिज्ञा करते प्रत्यक्ष जनलेल्या भोगलेल्या अनुभवातून ती कविता साकार होते."४ वाहरू सोनवणे यांचा गोधड, विनायक तुमराम यांचा गोंडवन पेटले आहे ,सुनील कुमरे यांचा तिरकमठा, भुजंग मेश्राम यांचा अभुजमाड, ऊलगुलान या कवींनी आपल्या काव्यातून जागतिकीकरणाविरोधात व प्रस्थापित शासन व्यवस्थे विरोधात क्रांतीचा फुंकलेला दिसून येतो.

आदिवासी कविता आपल्या न्यायासाठी व हक्कासाठी जगणारी आहे. सामाजिक मूल्यांचे भान ठेवून अखंड मानवतावादासाठी लढा देण्याची तयारी आदिवासी कवितेत आहे. आदिवासी साहित्यात वाहरू सोनवणे हे पहिल्या पिढीतील लेखक त्यांच्या कवितांमधून आदिवासी जमातीचे जीवन व एकूणच त्यांच्या स्थिती गतीचे दर्शन होते आदिवासी साहित्यात वाहरू सोनवणे यांची कविता ही आदिवासी जीवनाच्या मुळाशी शिरताना दिसते त्यांच्या गोधड या कवितेतून त्यांनी आदिवासींच्या जीवनाची व्यथा मांडली आहे.

"माझी फाटकी गोधड ,
मळलेली गोधडीतल्या गोधडीत ,
आंबट वासाने नाक ,
खालीवर करून,
कुशी बदलत राहिलो,
गोधडीत नाक खुपसून,
आंबट वास सोसत राहिलो" ५

प्राचीन काळापासून आजवर आदिवासी जमातीचे जगणे त्यांच्या जीवनातील दुःख दारिद्य वेदना कोणी सोडविण्याचा प्रयत्न केला नाही. जसे जन्माला आले तसे जगणे निसर्गालाच मायबाप म्हणून आपले नशीब आदिवासी आजमावत राहिले यातना शोषत राहिले वारू सोनवणे यांनी गोधळ ही प्रतिमा वापरून स्वतःचे जीवनानुभव कवितेतूनमांडले आहे जागतिकीकरणाच्या नावाखाली आदिवासी स्त्रियांवर आणि त्यांच्या अब्रूवर वाईट नजर टाकणाऱ्या समाजाला संस्कृती या आपल्या कवितेतून कुसुम आलम ठणकावून सांगतात.

"मित्रा!ठणकावून सांग त्यांना !
जंगलातच फिरलो आम्ही अर्धनग्न!

कॅमेऱ्या पुढे विवस्त्र झाल्याच नाहीत माया बहिणी..... !

आमच्या मुक्त लैंगिकतेवर बोलाल तर खबरदार !

विवाहासाठी ब्लड ग्रुप चेकिंग ची वेळ !

आम्हावर यायची आहे.” ६

आदिवासी स्त्रीयांकडे फक्त भोग वस्तू म्हणून पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन आता स्त्रीला सुद्धा जगण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. संस्कृतीच्या नावाखाली प्रस्थापित समाजव्यवस्थेचा व स्त्रियांच्या असणाऱ्या अवस्थेचा बुरखा  फाडण्याचे काम कुसुम अलाम यांनी केलेले आहे. आदिवासी जीवनाचे दुःख रानावनातील जीवन अन्नासाठी व पोटासाठी करावी लागणारी पायपीट पोटाची चिंता ही नित्याचीच गोष्ट पण तरीही भाकरीचा प्रश्न सुटत नाही अशा विदारक परिस्थितीचे चित्रण आदिवासी कवितेतून आले आहे.

“पोट भरून खा बरं ,

अश्रू ?

अश्रूंच काय ,

हे तर रोजच वाहत राहतात

तुम्ही जेव्हा पोट भरून” ७

देशाला स्वातंत्र्य मिळूनही आदिवासी जमातींचे जीवनमान सुधारले नाही भूक उपासमार कुपोषण यासारख्या भीषण प्रश्नांनी आदिवासींना ग्रासले आहे. त्यांना वाचा फोडण्याचे काम वाहरू सोनवणे यांची कविता करते सत्ताधारी व शासन व्यवस्था यांच्या विरुद्ध मनातील असंतोष व्यक्त करताना प्रस्थापित राजकारण्यांना आदिवासी प्रश्न विचारतात की, आमच्या जखमा तुम्हाला स्वस्थ बसू देणार नाही. या वेदनांची परतफेड तुम्हाला करावीच लागेल अशी काही विद्रोही भावना वाहरू सोनवणे यांची हाका जखमांच्या या कवितेतून दिसून

येते. नागर संस्कृती पासून लांब राहणारा रानावनात पशुपक्ष्यांच्या सानिध्यात राहणारा आदिवासी समाज. निसर्गाच्या शास्त्राला मानणारा अशा या समाजाला जागतिकीकरण म्हणजे काय? हे न समजणारे आहे. पण हेच जागतिकीकरण आदिवासी जमातींचे जगण्याचे स्वातंत्र्य आणि अधिकार हिरावून घेत असेल तर त्याविरुद्धचा लढा आदिवासी कवितेतून दिसून येतो. परंतु त्या लढ्याची भाषा ही साधी सोपी आणि सौम्य पद्धतीची आहे. आदिवासीचा विद्रोह हा सनदशीर मार्गाचा आहे. मोर्चे काढून चळवळ उभारून आदिवासी आपले हक्क या राजकीय व्यवस्थेला मागत आहे. आजही शासन दरबारी आदिवासी जमातींचे अनेक प्रश्न आणि मागण्या या प्रलंबित आहे आरोग्यासारख्या शिक्षणासारख्या मूलभूत सुविधा आदिवासींपर्यंत पोहोचू शकल्या नाहीत दोन वेळच्या पोट भरण्यासाठी आजही आदिवासी जमाती वणवण भटकत आहेत . हे कुठेतरी थांबले पाहिजे आणि माणूस म्हणून आम्हालाही जगता आले पाहिजे. जगण्याचा हा अधिकार आणि स्वातंत्र्य आम्हाला सुद्धा अनुभवायला आले पाहिजे असा आशावाद आदिवासी कविता व्यक्त करते

“सत्तेच्या हिरव्या पानाखाली,
झोपा घेणारे बगळे,
झोपेशी भांडत आहेत आणि,
त्यांच्या पाठिंब्यावर,
लचके तोडणाऱ्यांना,
धडकी भरली आहे” ८

वाहरू सोनवणे यांची कविता काहीशी विद्रोह करताना दिसते. आदिवासी चळवळीत काम करताना सबंध आदिवासींच्या न्याय व हक्कासाठी लढा दिला पाहिजे अशी त्यांची कविता आहे आदिवासी जमातींवर होणारे अन्याय अत्याचार हे नित्याचे झाले आहे त्यांनी न्याय मागाव तर कुठे? शासन व्यवस्थेची अनास्था याविषयी उलगुलान या कवितेत भुजंग मेश्राम लिहितात.

“सकाळच्या चहा सोबत नियमित,

आता रोज आदिवासींवरील अत्याचाराच्या बातम्या,

वरुड .....कोडपाखिंडी ....कोंड्याची वाडी .....

आणि आता इंदरवल्ली ....

किती स्वस्त होत चाललोय आम्ही.”९

डोंगर दर्या पर्वत खोऱ्यांमध्ये आदिवासी जमाती विखुरल्या आहेत .कुठलेही तक्रार न करता आपले जीवन व्यथीत करीत आहेत. शासनाने राबवलेल्या अनेक योजना खऱ्या आदिवासींपर्यंत आजही पोहोचू शकले नाहीत. दर वर्षाच्या अर्थसंकल्पात शासनाकडून आदिवासींसाठी योजनांचा पाऊस पडतो परंतु पावसाच्या पाण्यासारख्या त्या कागदावरच वाहून जातात इतकेच नाही तर वाड्या वस्तीवर राहणाऱ्या आदिवासी जमातींवर हल्ले केले जातात .त्यांना त्यांच्या हक्काच्या घरातून पळवून लावण्यासाठी बळाचा वापर केला जातो प्रसंगी शस्त्राचा धाक दाखवला जातो. अशा अवस्थेत आदिवासी लोक जमातींनी राहावे तरी कुठे ? अशी सुरक्षित जागा आहे तरी कुठे ? असा प्रश्न आदिवासी कविता विचारत आहे एकीकडे नवनवीन शहरे निर्माण होत आहे अनेक सोयी सुविधा निर्माण होत आहेत परंतु तरीही अजूनही पालाच्या झोपडीत आदिवासी राहत आहेत. आदिवासी म्हणून प्रस्थापितांकडून मिळणारी तुच्छतेची वागणूक थांबली पाहिजे आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात आदिवासी लोक जमातींना सामावून घेतले पाहिजे असा विचार आदिवासी कविता मांडताना दिसते.

जागतिकीकरणाच्या या प्रभावात आदिवासींवर होणारे अन्याय अत्याचार हे थांबण्याचे नाव घेत नाही देशाला महासत्ता बनवू पाहणाऱ्या सत्ताधाऱ्यांचे लक्ष आदिवासी कविता खेचण्याचे काम करते देशाच्या विकासात आदिवासी लोकांचे महत्त्वाचे योगदान आहे श्रम संस्कृती, कृषी संस्कृती हा आदिवासींच्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. आणि तेच आदिवासी आज मुख्य प्रवाहापासून कुठेतरी लांब आहे म्हणून त्यांच्या हक्कासाठी व त्यांना न्याय मिळावा यासाठी आदिवासींसाठी लढा द्यावाच लागेल त्यांच्या अस्तित्वासाठी एक

चळवळ उभारावीच लागेल. जागतिकीकरणामुळे अनेक नवनवीन बदल घडताना दिसत आहे त्याचा कुठेतरी परिणाम मानवी जीवनावर ती सुद्धा होत आहे स्मार्ट सिटी एक्सप्रेस वे मेट्रो अद्यावत मॉल मोठमोठी धरणे निर्माण केली जात आहे नैसर्गिक संसाधनांचा वारे माप वापर सुरू आहे अनेकांना रोजगार उपलब्ध झाला परंतु अनेकांना आपल्या रोजगाराला मुकावे लागले आपल्या हक्काच्या घराला सोडावे लागले. शहरीकरणाच्या या स्पर्धेत व सुधारणांच्या नावाखाली आदिवासी जमातींना विस्थापित व्हावे लागले. सरकार आदिवासींच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करीत आहेत आणि म्हणूनच आदिवासींच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी शांततेच्या मार्गाने आपल्या मागण्या सरकारपर्यंत मांडत आहे. मुळातच लढाऊ वृत्ती असलेला आदिवासी समाज हा देशासाठी लढला क्रांतीसाठी लढला मातृभूमीच्या रक्षणासाठी लढला परंतु स्वतःच्या हक्कासाठी मात्र तो सनदशीर मार्गाने लढत आहे त्यासाठीच तो चळवळीचा मार्ग स्वीकारत आहे.

“चळवळ म्हणजे काही दोन पाच दिवसांची जत्रा नव्हे,

की नदीला आलेला पूर नव्हे,

चळवळ म्हणजे माणुसकीचा गाभा,

सतत विकसित होत जाणारा प्रवाह तो !”१०

वरीलप्रमाणे आदिवासी कविता जागतिकीकरणाच्या दाहकतेत निर्माण झाली ही कविता सबंध आदिवासींच्या दुःखाला व प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम करते आदिवासी कवितेच्या निमित्ताने एक नवे आदिवासी विश्व इतरांना दाखवण्याचा प्रयत्न कवितेतून केला आहे शतकानो शतके अनवाणी पायांची जीवनाची दाहकता ही कविता मांडते आदिवासी जमातीचे प्रतिनिधित्व ही कविता करते नुसत्या जागतिकीकरणाने आदिवासींचे प्रश्न सुटणार नाहीत तर त्यासाठी आदिवासींना देशाच्या विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहेजागतिकीकरणाच्या मुख्य प्रवाहात आदिवासी कवितेने आपली

संस्कृती ,आपला इतिहास ,आपले जगणे यांचे ठळक चित्रन केले आहे . मानवतावादी मूल्य जोपासण्याची भाषा आदिवासी कविता करते.

- निष्कर्ष
  1. आदिवासी कविता सबंध आदिवासी समाजाचे प्रतिनिधित्व करते.
  2. आदिवासी कविता आदिवासी जमातींच्या जीवन जगण्याच्या स्थिती गतीचे वास्तव चित्रण करते.
  3. आदिवासी कविता व्यथा वेदना मांडण्यासोबतच न्याय व हक्कासाठी चळवळीच्या मार्ग पत्करण्याची भाषा करते.
  4. आदिवासी कवितेचा प्रेरणा स्रोत हा निसर्ग आणि आदिवासींचे जीवन आहे हे दिसून येते.
- समारोप

  वरील प्रमाणे जागतिकीकरणाच्या या प्रवाहात आदिवासी कविता नवे प्रश्न घेऊन फुलताना दिसते. आज शिक्षित झालेला आदिवासी तरुण खऱ्या स्वातंत्र्याची मागणी करताना दिसत आहे. भुकेची दाहकता, रानावनातील जीवन, दररोजची भटकंती ही कधी थांबेल एक नवा आशावाद आदिवासी कवितेत पहायला मिळतो. जागतिकीकरणाने देशाला एक नवी ओळख मिळेल परंतु आदिवासी म्हणून असणारी ही ओळख कधी पुसेल असा प्रश्न आदिवासी कविता विचारते? मूलभूत गरजांच्या पूर्ततेसाठी आजही आदिवासी जमाती वाट पाहत आहेत. त्यांना त्यांचे हक्क व अधिकार हे मिळाले पाहिजे. असा आशय आदिवासी कवितेतून व्यक्त होतो.

- **संदर्भ :-**

1) डॉ. रोंगटे सुरेखा- जागतिकीकरण आणि आदिवासी, आदिवासी साहित्य आणि लोककला, संपादन-डॉ.शत्रुघ्न फड २०१२, पृष्ठ क्रमांक ५५

2) डॉ.सुरवाडे मनोहर- आदिवासी साहित्य प्रवाह- सुगम प्रकाशन अमरावती २०१२, पृष्ठ क्र. २५

3) कुमरे सुनील, तीरकमठा, हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, पृष्ठ क्रमांक १०.

4) डॉ.सुरवाडे मनोहर , उनी, पृष्ठ क्रमांक २५

5) सोनवणे वाहरू, गोधड, गोधड, सुगावा प्रकाशन, पुणे, १९८७, पृष्ठ क्रमांक ७

6) लोखंडे बी. एम., आदिवासी काव्य आणि जागतिकीकरण, अलाम कुसुम, संस्कृती, आदिवासी साहित्य आणि लोककला -,संपादन डॉ. शत्रुघ्न फड, २०१२, पृष्ठ क्रमांक १७८

7) सोनवणे वाहरू – गोधड, कटाक्ष, सुगावा प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्रमांक २६.

8) तत्रेव, हाका जखमांच्या, सुगावा प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्रमांक १८

9) मेश्राम भुजंग,उलगुलान, तथागत प्रकाशन, ठाणे १९९०

10) सोनवणे वाहरू, उनी, चळवळ म्हणजे काय? , पृष्ठ क्रमांक ४४